Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ७, अंक १२] गुरुवार ते बुधवार, एप्रिल ८-१४, २०२१/चैत्र १८-२४, शके १९४३ [पृष्ठे १९, किंमत : रुपये ११.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

# भाग एक-अ–नागपूर विभागीय पुरवणी

**(भाग चार-ब मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ५२.

**विभागीय आयुक्त, यांजकडून**

**महाराष्ट्र ग्रामपंचायतीचे संबंधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रावर विस्तारीत करण्याबाबत) नियम, २०१४ अंतर्गत नियम ४ अन्वये गाव जाहीर करण्यासाठी अधिसूचना**

क्रमांक मशा-७(३)-सीआर-६-२०१६.—

ज्याअर्थी, महाराष्ट्र ग्रामपंचायती संबंधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रावर विस्तारीत करण्याबाबत) नियम, २०१४ च्या नियम ४ अंतर्गत प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून पाडा/पाड्यांचा समूह वस्ती/वस्त्यांचा समूह गाव म्हणून विनिर्दिष्ट करण्यात येते ;

आणि ज्याअर्थी, सोहगांव ग्रामपंचायतीतील मंजिगडटोला गावामध्ये वस्त्यांचा समूह यांनी महाराष्ट्र ग्रामपंचायती संबंधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रावर विस्तारित करण्याबाबत) नियम, २०१४ च्या नियम ४ प्रमाणे दिनांक १-७-२०१५ रोजी गाव जाहिर करण्यासंदर्भात ठराव केलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, उपविभागीय अधिकारी, एटापल्ली, जि. गडचिरोली यांनी यासंदर्भात दिनांक २८-३-२०१६ रोजी सोहगांव ग्रामपंचायतीत येणा-या गावामध्ये वस्त्यांचा समूह यांची संबंधित नोंदणीकृत मतदार व स्थानिक अधिका-यांच्या उपस्थितीत चौकशी केली आहे.

आणि ज्याअर्थी, जिल्हाधिकारी, गडचिरोली यांनी चौकशीअंती संबंधीत मंजिगडटोला वस्ती/टोला/वस्त्यांचा समूह पेसा नियम ४ अन्वये गाव घोषित करण्याची शिफारस केलेली आहे.

आणि त्याअर्थी, मी, डॉ. संजीव कुमार, विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर पेसा नियमाच्या नियम ४ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून मंजिगडटोला येथे वस्त्यांचा समुहास पेसा नियम ४ अंतर्गत गाव घोषित करीत आहे.

सदर गावांच्या नैसर्गिक हद्दीचे तपशील तसेच संबंधित नैसर्गिक साधनांच्या वापराची पारंपारिक हद्द खालीलप्रमाणे आहे.

**अनुसूची—पाच**

| अ.क्र. | हद्दीचे तपशील | | समूह नंबर/कम्पार्टमेंट नंबर | क्षेत्र | इतर खुणा (आवश्यक असल्यास) |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | | (३) | (४) | (५) |
| | | | | हे. आर | |
| १ | मोठ्या झाडाचे जंगल | पूर्व | २६ पैकी | | चराई, इमारती, जळाऊ लाकूड, इ. करीता राखून ठेवलेले. |
| | | दक्षिण | ५ पैकी | २१५ ०० | |
| | | पश्चिम | २६ पैकी | | |
| | | उत्तर | २६ पैकी | | |
| २ | झुडपी जंगल | पूर्व | . . | | |
| | | दक्षिण | . . | ० ०७ | |
| | | पश्चिम | २३ | | |
| | | उत्तर | . . | | |
| ३ | तलाव क्षेत्र | पूर्व | . . | | |
| | | दक्षिण | . . | ० ०० | |
| | | पश्चिम | . . | | |
| | | उत्तर | . . | | |
| ४ | आबादि क्षेत्र | पूर्व | . . | | |
| | | दक्षिण | . . | ० ०० | |
| | | पश्चिम | . . | | |
| | | उत्तर | . . | | |
| ५ | शेत जमिनीचे क्षेत्र | पूर्व | ३० | | |
| | | दक्षिण | . . | १२ ६० | |
| | | पश्चिम | २२,२४,२५,२७,२८,५५ | | |
| | | उत्तर | २९ | | |
| ६ | रस्ता | पूर्व | . . | | |
| | | दक्षिण | . . | २ ०० | |
| | | पश्चिम | . . | | |
| | | उत्तर | . . | | |
| | | | एकूण सर्व्हे क्रमांक-११ . . | २२९ ६७ | |

सदर गाव जाहीर केल्यानंतर जाहीर केलेल्या गावांचे क्षेत्र वगळून उरलेले क्षेत्र मूळ गाव म्हणून ओळखले जाईल. या गावासाठी पेसा अधिनियमातील तरतुदी व नियमातील तरतुदी लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

नागपूर :
दिनांक १७ मार्च २०२१.

**डॉ. संजीव कुमार,**
विभागीय आयुक्त,
नागपूर विभाग, नागपूर.

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ५३.

## जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, यांजकडून

### आदेश

क्रमांक जिउनि-भं-कृउबास-ला-कलम ५७(३)-आदेश-१००४-२०२०.—

महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम ५७(४) नुसार व मा. पणन संचालक, पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे परिपत्रक क्र.सीएमआर-आर-ॲक्ट-रूल-८१, दिनांक १८ सप्टेंबर, १९८१ अन्वये निम्नस्वाक्षरीकारास प्राप्त अधिकारानुसार, मी, एम. एम. देशकर, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, भंडारा याद्वारे कृषि उत्पन्न बाजार समिती, लाखांदूंर, जि. भंडारा या बाजार समितीकडे महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे यांच्या दिनांक ३१-१२-२०२० अखेर थकीत असलेल्या कर्जाच्या रक्कमा व अंशदानाच्या रक्कमा वसुली करावे किंवा कसे? याबाबतचे प्रश्नाचे निर्णयासाठी व त्या प्रयोजनासाठी न्यायाधिकरणामध्ये उक्त कायदा व त्याखालील नियमान्वये पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्याकरीता श्री. एच. जे. हटवार, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, तालुका लाखांदुर, जि. भंडारा यांची नियुक्ती करीत आहे.

सदरहू आदेश आज दिनांक २५ फेब्रुवारी २०२१ रोजी माझे सही व शिक्यानिशी पारीत केला असे.

भंडारा :
दिनांक २५/२६ फेब्रुवारी २०२१.

**मनोज देशकर,**
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, भंडारा.

---

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ५४.

## अध्यक्षा, नगर परिषद, यांजकडून

क्रमांक नपब्र-नियोजन व विकास-१२७-२०२१.—

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक टीपीएस-२२९९-१००१-प्र.क्र. १११-नवि-९, मुंबई दिनांक २८ जून २००२ अन्वये विकास योजना ब्रम्हपुरी भागशः मंजूर असून, ती दिनांक २८ जून २००२ पासून अंमलात आलेली आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना शासन निर्णय क्रमांक टीपीएस-२२९९-१००१-प्र.क्र.१११-भाग-२-नवि-९, दिनांक १३-७-२००५ अन्वये मंजूर झालेली आहे.

नगर परिषद ब्रम्हपुरीने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१) अन्वये उपरोक्त मंजूर विकास योजना ब्रम्हपुरी मध्ये खाली दर्शविलेल्या तपशिलाप्रमाणे किरकोळ फेरबदल करण्याचे प्रस्तावित केले आहे.

### विवरण

| अ. क्र. | भूमापन क्रमांक | क्षेत्र (आराजी) | विकास योजनेतील प्रस्ताव | नियोजित उपयोग | न.प. सर्वसाधारण विशेष सभा दिनांक | ठराव क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| | | हे. आर | | | | |
| १ | मौजा-देलनवाडी भूमापन क्र. ११८ | ० ७२ | शेतीचे झोन | रहिवास वापर | २१-१२-२०२० | १३ |
| २ | मौजा-देलनवाडी भूमापन क्र. २६६ | १ ४२ | शेतीचे झोन | रहिवास वापर | २१-१२-२०२० | १४ |
| ३ | मौजा-देलनवाडी भूमापन क्र. २६८ | ० ५२ | शेतीचे झोन | रहिवास वापर | २१-१२-२०२० | १५ |
| ४ | मौजा-देलनवाडी भूमापन क्र. ११३ | १ ५३ | शेतीचे झोन | रहिवास वापर | २१-१२-२०२० | १६ |
| ५ | मौजा-देलनवाडी भूमापन क्र. ३८/३ | ० १२ | खेळाचे मैदान आ.क्र. ५३ | रहिवास वापर | २१-१२-२०२० | १७ |

उक्त फेरबदल दर्शविणारा नकाशा व त्यासंबंधी माहिती अहवाल ब्रम्हपुरी नगर परिषदेच्या कार्यालयात कार्यालयीन कामाकाजाचे वेळेत अवलोकनार्थ उपलब्ध आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१) अन्वये असे उद्‌घोषीत करण्यात येते की, नियोजित फेरबदलासंबंधी कोणाला काही आक्षेप अगर सूचना असतील तर त्यांनी ही अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याचे आंत (३० दिवसात) अध्यक्ष, नगर परिषद, ब्रम्हपुरी यांचेकडे लेखी सादर कराव्यात. जेणेकरून नियोजित फेरबदलाचा प्रस्ताव (कोणत्याही सुधारणा असल्यास त्यासह) मंजुरीसाठी राज्य शासनाकडे सादर करता येईल.

ब्रम्हपुरी :
दिनांक २५ मार्च २०२१.

**सौ. रिता दिपक उराडे,**
अध्यक्षा,
नगर परिषद, ब्रम्हपुरी.

---

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ५५.

BY PRESIDENT, MUNICIPAL COUNCIL

No. MCB-Planning-127-2021.—

Government of Maharashtra, Urban Development Department, Mantralay, Mumbai, vide there Notification No.TPS-2299-1001-111-UD-9-Part-1, dated 28 June 2002, sanctioned. Part of the Draft Development Plan of Bramhapuri and Excluded parts of the said Development Plan sanctioned vide Government Notification No. TPS-2299-1001-111-UD-9,Part 2 Dated 13 July 2005.

The Municipal Council, Bramhapuri proposed to make minor modification in the aforesaid sanctioned Development Plan under Section 37(*1*) of Maharashtra Regional & Town Planning Act, 1966. The Details about proposed minor are as below.—

DESCRIPTION

| Sr. No. | Mouza/ Sruvey No. | Area | Present Use | Proposed use after Modification | Municipal Council General/ Special Meeting | Resolution No. |
|---|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) |
| | | H. A. | | | | |
| 1 | Mouza-Delanwadi Survey No. 118 | 0 72 | Agriculture Zone | Residental Propose | Date 21-12-2020 | 13 |
| 2 | Mouza-Delanwadi Survey No. 266 | 1 42 | Agriculture Zone | Residental Propose | Date 21-12-2020 | 14 |
| 3 | Mouza-Delanwadi Survey No. 268 | 0 52 | Agriculture Zone | Residental Propose | Date 21-12-2020 | 15 |
| 4 | Mouza-Delanwadi Survey No. 113 | 1 53 | Agriculture Zone | Residental Propose | Date 21-12-2020 | 16 |
| 5 | Mouza-Delanwadi Survey No. 38/3 | 0 12 | Play Ground R. No. 53 | Residental Propose | Date 21-12-2020 | 17 |

The plan and reports containing the description of above modification can be seen in the office of the Municipal Council, Bramhapuri during the office hours.

Now, in pursuance of Section 37(*1*) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 it is heeby notified that any suggestion or Objection to the proposed modification as details above shall communicate the same in writing to the undersigned within period of the Month (30 days) from the date of notification published in the *Gazzette of Government of Maharashtra.*

The Objection or Suggestion if any received within above period will be considered before submitting the proposal to the Government.

Bramhapuri :
Dated the 25th March 2021.

SAU. RITA DIPAK URADE,
President,
Municipal Council, Bramhapuri.

---

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ५६.

**मुख्याधिकारी, नगर पंचायत, यांजकडून**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २३(१) [ कलम २१(२) सह ] नुसार सावली, नगर पंचायत क्षेत्राची विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर करणेबाबत.**

क्रमांक नपसा-कावि-८१-२०२१.—

शासनाने नगर विकास विभागाकडील शासन निर्णय क्रमांक एमयुएन-२०१४-प्र.क्र.१०१-भाग-१-नवि-१८, दिनांक २३-४-२०१५ अन्वये १७ जून २०१५ ला सावली नगर पंचायत स्थापन केलेली आहे. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २१(२) अन्वये सावली नगर पंचायत क्षेत्राचा नियोजनबद्ध विकास होण्यासाठी त्या क्षेत्राची विकास योजना तयार करणे आवश्यक आहे.

सबब, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २३(१) [ कलम२१(२) सह ] अन्वये सावली, नगर पंचायतीने विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर करण्यासाठी विशेष सभेचा ठराव क्र. ०१, दिनांक २६-३-२०२१ अन्वये मान्यता दिली आहे. त्यानुसार सदरची सूचना प्रसिद्ध करण्यात येत आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे २३(२) नुसार सावली, नगर पंचायतीच्या विकास योजनेमध्ये समाविष्ट असलेल्या क्षेत्राची हद्द दर्शविणारा नकाशा सावली, नगर पंचायतीच्या कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनासाठी ठेवण्यात आलेला आहे.

ज्या नागरिकांच्या याबाबत काही सूचना/हरकती असतील त्यांनी ही सूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिद्ध होईल त्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत मुख्याधिकारी, सावली, नगर पंचायत यांचेकडे लेखी स्वरुपात द्याव्यात विकास योजना तयार करतांना त्या सूचना/हरकतीचा योग्य तो विचार करण्यात येईल.

सावली :
दिनांक ३१ मार्च २०२१.

**कु. मनिषा ना. वजाळे,**
मुख्याधिकारी,
नगर पंचायत, सावली.

ना.-एक-अ-२ (१५०६).

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ५७.

BY CHIEF OFFICER, NAGAR PANCHAYAT

**Declaration of Intention to prepare Development Plan of saoli Nagar Panchayat u/s 23*(1)* [read with Section 21*(2)*] of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.**

No. NPS-OD-81-2021.—

Government of Maharashtra in Urban Development Department, *vide* its Notification No. MUN-2014/C.R.101/ Part-1/UD-18, dated 23-4-2015 Constituted Saoli, Nagar Panchayat on dated15 June 2015. It is necessary to prepare the Development Plan for the area of Saoli, Nagar Panchayat as per Section 21(*2*) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 for planned Development of the said area.

Hence, the Saoli, Nagar Panchayat by its Resolution No. 01, dated 26-3-2021 has given consern to declare its intention to prepare Development Plan, as per provision of Section 23(*1)* [read with Section 21(*2*)] of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 accordingly, this notice is being published.

The plan showing boundary of the area included in Development Plan of Saoli, Nagar Panchayat is kept open for inspection by the public on office working days, during office hours at the office of the Saoli, Nagar Panchayat, as required under Section 23(*2)* of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966.

Any suggestion/objection of the public in this regard, may be forwarded in writing to the Chief Officer, Saoli, Nagar Panchayat within a period of 60 (sixty) days from the date of publication of this notice in *Maharashtra Government Gazette.* The suggestion/objection shall be duly considered while preparing the Development Plan.

Saoli :
Dated the 31st March 2021.

Ku. MANISHA N. VAJALE,
Chief Officer,
Saoli, Nagar Panchayat.

## पुढील अधिसूचना असाधारण राजपत्र म्हणून त्यांच्यापुढे दर्शविलेल्या दिनांकांना प्रसिद्ध झालेल्या आहेत.

८

**गुरुवार, मार्च १८, २०२१/फाल्गुन २७, शके १९४२**

भाग १-अ (असा.) (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १३.

**जिल्हाधिकारी, यांजकडून**

**वाचा.—** (१) मा. सचिव, मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचे पत्र क्र. रानिआ-जिपपंस-२०१८-प्रक१२-का-७, दिनांक २६-०३-२०१९.

(२) मा. राज्य निवडणूक आयोग, यांचे पत्र क्र. रानिआ-जिपपंस-२०१९-प्रक१९-का-७, दिनांक १९-११-२०१९.

(३) मा. सचिव, राज्य निवडणूक आयोग, यांचे पत्र क्र. रानिआ-जिपपंस-२०२१-प्रक५-का-७, दिनांक ०५-०३-२०२१.

(४) मा. सचिव, राज्य निवडणूक आयोग, यांचे पत्र क्र. रानिआ-जिपपंस-२०२१-प्रक५-का-७, दिनांक १६-०३-२०२१.

(५) मा. सचिव, राज्य निवडणूक आयोग, यांचे पत्र क्र. रानिआ-जिपपंस-२०१९-प्रक१९-का-७, दिनांक २०-१२-२०१९.

(६) या कार्यालयाकडून प्रसिध्द करण्यात आलेली दिनांक १०-०१-२०२० रोजीची अधिसूचना.

(७) या कार्यालयांचे आदेश क्र. अका-ग्रापनि-डे-१३-कावि१४७-२०२१, दिनांक १०-०३-२०२१.

**आदेश**

क्र. अका-ग्रापनि-डे-१३-कावि१७९-२०२१.—

संदर्भांकित अनुक्रमांक – (१) च्या पत्रान्वये नागपूर जिल्हा परिषद व त्याअंतर्गत १३ पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणूक २०२० साठी प्रभाग रचना व आरक्षण सोडत कार्यक्रम देण्यात आला होता. सदर कार्यक्रमासोबत प्रपत्र - १ व प्रपत्र - २ अनुक्रमे नागपूर जिल्हा परिषद व नागपूर जिल्हा परिषदे अंर्तगत येणा-या १३ पंचायत समितीसाठी अनुज्ञेय ठरत असलेला जागांचा तपशील ठरवून देण्यात आला होता. त्याप्रमाणे नागपूर जिल्हा परिषदेसाठी अंतिम प्रभाग रचना व आरक्षण दिनांक १७-०५-२०१९ रोजी प्रसिध्द करण्यात आले होते.

तद्नंतर, संदर्भांकित अनुक्रमांक – (२) च्या पत्रान्वये नागपूर जिल्हा परिषद व त्याअंतर्गत येणा-या १३ पंचायत समित्यांची सार्वत्रिक निवडणूकीचे मतदान दिनांक ०७ जानेवारी २०२० रोजी होवून दिनांक ०८ जानेवारी २०२० रोजी मतमोजणी झाली असून महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक-अ असाधारण क्रमांक - ६ अन्वये या कार्यालयांचे आदेश क्रमांक /जिपपंस/निवडणूक/कावि-६७-२०२०, दिनांक १० जानेवारी २०२० नागपूर

जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये निवडून आलेल्या उमेदवारांची नावे प्रसिध्द करण्यात आली होती.

जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक - २०२० च्या निवडणुकीबाबत मा. सर्वोच्च न्यायालयाच्या रिट याचिका (सिव्हील) क्रमांक ९८०-२०१९ यासोबत संलग्न याचिका मधील दिनांक ०४-०३-२०२१ रोजीच्या आदेशाच्या अनुषंगाने नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील निवडून आलेल्या उमेदवारांची निवडणूक रद्द करणेबाबत दिलेल्या निर्देशाप्रमाणे नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरीता जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ च्या कलम १२(२) (क) नुसार देय असलेले २७% चे आरक्षण हे मा. सर्वोच्च न्यायालयाच्या के. कृष्णमुर्ती व इतर वि. भारत सरकार मधील आदेशानुसार कमाल ५०% आरक्षणाच्या मर्यादेत ठेवून सदर जागांच्या फेर निवडणुका घेण्याचे मा. राज्य निवडणूक आयोगाला निर्देश दिले आहेत.

सदर निवडणूक प्रक्रिये दरम्यान नागपूर जिल्हा परिषद व त्या अंतर्गत येणा-या १३ पंचायत समितीच्या नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाची निवडणूक मा. सर्वोच्च न्यायालयाचे विशेष अनुमती याचिका क्रमांक - ३३९०४-३३९१० मधील आदेशाच्या अधीन राहून घेत असल्याबाबत संदर्भाकित अनुक्रमांक (०४) अन्वये सर्व निवडणूक निर्णय अधिकारी यांना कळविण्यात आले होते. तसेच त्याबाबतची व्यापक प्रसिध्दी ही दिनांक २२ डिसेंबर २०१९ रोजी प्रेस नोकट स्थानिक वृत्तपत्र “महाराष्ट्र टाईम्स” मधून प्रसिध्दी करण्यात आली होती.

संदर्भ (०४) अन्वये जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक - २०२० च्या निवडणुकीबाबत मा. सर्वोच्च न्यायालयाच्या रिट याचिका (सिव्हील) क्रमांक ९८०-२०१९ यासोबत संलग्न याचिका मधील दिनांक ०४-०३-२०२१ रोजीच्या आदेशान्वये अंतिम निर्णय झाल्याने, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील निवडून आलेल्या उमेदवारांची निवडणूक रद्द करणेबाबत मा. राज्य निवडणूक आयोगाचे निर्देश प्राप्त झाले आहेत. नागरिकांचा मागास प्रवर्गाच्या सर्वच जागा मा. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णयाच्या तारखेपासून रिक्त झाल्याचे समजून त्यानुसार अशा संस्थाच्या उर्वरित कालावधीकरीता सदर जागा सर्व साधारण प्रवर्गातून भराव्या लागतील असे आयोगाचे मत आहे. त्यानुसार नागरिकांचा मागास प्रवर्गाच्या सर्व जागा रिक्त करणे अपरिहार्य आहे. संदर्भ क्रमांक (०३) अन्वये मा. राज्य निवडणूक आयोग यांनी नागरिकांचा मागास प्रवर्गाच्या जागा रिक्त करणेबाबत कळविले होते व त्या अनुषंगाने या कार्यालयाकडून संदर्भ क्रमांक (७) अन्वये नागपूर जिल्हा परिषद येथील १६ व त्याअंतर्गत येत असलेल्या ६ पंचायत समितीत येत असलेल्या १५ नागरिकांचा मागास प्रवर्गातील जागा रिक्त करण्यात आलेल्या आहेत.

संदर्भ (०४) अन्वये मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांना प्राप्त विधीमतानुसार कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूकासंदर्भात नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गाच्या आरक्षणाची टक्केवारी मा. न्यायालयाने आदेशात नमुद केलेल्या तीन चाचण्या पूर्ण केल्याशिवाय राज्य शासनास ठरविता येणार नाही. तसेच नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गाच्या जागा या कमाल आरक्षणाच्या ५० टक्के मर्यादेत असो अथवा नसो, मा. न्यायालयाच्या आदेशाने त्या सर्व रिक्त झाल्या आहेत त्यामुळे उपरोक्त याचिकेच्या निर्णयाच्या अधिन संपन्न झालेल्या सर्व जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुकांच्या संदर्भात नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गाच्या सर्व जागा मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या तारखेपासून रिक्त झाल्याचे समजून त्यानुसार अशा संस्थाच्या उर्वरित कालावधीकरीता सदर जागा सर्व साधारण प्रवर्गातून भराव्या लागतील, असे आयोगाचे मत झाले आहे. त्यामुळे नागपूर जिल्ह्यातील उर्वरित ७ पंचायत समिती अंतर्गत येत असलेल्य १६ नागरिकांचा मागास प्रवर्गातील सदस्यांच्या जागा रिक्त झाल्या असल्याचे आदेश बजावण्याबाबत मा. राज्य निवडणूक आयोग यांच्याकडून आदेश प्राप्त झालेले आहे.

त्याअनुषंगाने नागपूर जिल्हा परिषद व त्याअंतर्गत येणा-या १३ पंचायत समितीच्या निवडणुकामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग यांच्या करीता आरक्षण देण्यात आलेल्या एकूण जागांची संख्या त्या स्थानिक स्वराज्य संस्थेतील एकूण जागांच्या ५०% पेक्षा जास्त होत असल्यास, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीस आरक्षित जागा एकूण ५०% आरक्षित जागेमधून वजा केल्यानंतर, उर्वरित जागेमधून नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गाकरीता जास्तीत जास्त २७% मर्यादेत आरक्षण देय होत आहे. त्याप्रमाणे नागपूर जिल्हा परिषद व त्याअंतर्गत येणा-या १३ पंचायत समितीमध्ये ५०% मर्यादेबाहेर आरक्षित झालेल्या जागांची आणि सर्वोच्च न्यायालयांच्या आदेशानुसार देय असलेल्या नागरिकांचा मागास प्रवर्गाच्या जागांचा तपशिल मा. आयोगाचा दिनांक १६ मार्च २०२१ च्या पत्रासोबतच्या परिशिष्ट - अ मध्ये दिला आहे.

त्याअर्थी, मा. सर्वोच्च न्यायालयांच्या निर्णयाप्रमाणे व मा. राज्य निवडणूक आयोग यांचे दिनांक १६ मार्च २०२१ रोजीच्या आदेशात दिलेल्या निर्देशाप्रमाणे नागपूर जिल्हा परिषद व त्याअंतर्गत येणा-या १३ पंचायतीसाठी मा. राज्य निवडणूक आयोगाचे दिनांक १९ नोव्हेंबर २०१९ निवडणूक कार्यक्रमाप्रमाणे निवडणूका होवून संदर्भाकित अनुक्रमांक (६) मधील अधिसूचनेत नमूद नागरिकांचा मागास प्रवर्गातून निवडून आलेले खालील नमूद परिशिष्ट-१ मध्ये १६ पंचायत समिती सदस्याचे सदस्यत्व तसेच सदस्यत्व या नात्याने धारण करीत असलेले पंचायत समिती व त्याअनुषंगाने इतर प्राधिकरणावरील सदस्यांचे सदस्यत्व, मी, रविंद्र ठाकरे, जिल्हाधिकारी, नागपूर या आदेशाद्वारे पुर्वलक्षी प्रभावाने रद्द करीत आहे.

**परिशिष्ट-१**

नागपूर जिल्हा परिषद अंतर्गत येणा-या १३ पंचायत समितीच्या सन २०१९-२०२० निवडणुकीमध्ये नागरिकांचा मागास प्रवर्गामधून निवडून आलेल्या परंतू मा. सर्वोच्च न्यायालयांच्या रिट याचिका क्रमांक ९८०/२०१९ यासोबत संलग्न याचिका मधील दिनांक ४ मार्च २०२१ रोजीच्या आदेशान्वये व मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचे आदेश दिनांक १६ मार्च २०२१ अन्वये सदस्य पद रद्द करण्यात आलेल्या सदस्यांची नावे.

| अ. क्र. | तालुका | पंचायत समिती गणांचे नाव | आरक्षण | निवडून आलेल्या सदस्यांचे नांव | कायमचा पत्ता |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १ | नरखेड | ०१-बेलोना | ना. मा. प्र (स्त्री) | आरघोडे रश्मी अशोकराव | रा. बेलोना, तह. नरखेड, जि. नागपूर. |
| २ | नरखेड | ०३-सावरगाव | ना. मा. प्र | दळवी वैभव वासुदेव | रा. मोहंदी (दळवी), तह. नरखेड, जि. नागपूर. |
| ३ | काटोल | १२-लाडगाव | ना. मा. प्र (स्त्री) | ठाकरे निलीमा अनिल | रा. ढवळापूर, तह. काटोल, जि. नागपूर. |
| ४ | काटोल | १३-मेटपांजरा | ना. मा. प्र | नागमोते निशीकांत जानराव | रा. आंजनगाव, तह. काटोल, जि. नागपूर. |
| ५ | पारशिवनी | ३५-चारगाव | ना. मा. प्र | घंगारे किसन सिताराम | रा. घाटकुकडा, तह. पारशिवनी, जि. नागपूर. |
| ६ | पारशिवनी | ३८-नयाकुंड | ना. मा. प्र (महिला) | निंबोने मंगला उमराव | रा. नयाकुंड, तह. पारशिवनी, जि. नागपूर. |
| ७ | मौदा | ५५-खात | ना. मा. प्र (स्त्री) | थोटे रक्षा श्रीहरी | रा. इजनी, तह. मौदा, जि. नागपूर. |
| ८ | मौदा | ५६-रेवराल | ना. मा. प्र | श्रावणकर स्वप्निल रामकृष्ण | रा. रेवराल, तह. मौदा, जि. नागपूर. |
| ९ | मौदा | ६२-चिरव्हा | ना. मा. प्र (स्त्री) | ठवकर दुर्गा राकेश | रा. चिरव्हा, तह. मौदा, जि. नागपूर. |
| १० | कामठी | ६८-महालगाव | ना. मा. प्र (स्त्री) | हटवार शिला खेमराज | रा. कापसी, तह. कामठी, जि. नागपूर. |
| ११ | कामठी | ७०-बिडगाव | ना. मा. प्र | मल्लेवार आशिष रामजी | रा. बिडगाव, तह. कामठी, जि. नागपूर. |
| १२ | नागपूर (ग्रामिण) | ७१-भोकारा | ना. मा. प्र (स्त्री) | काकडे अर्चना ईश्वर | रा. भोकारा, गोधनी रेल्वे, तह. नागपूर (ग्रामिण), जि. नागपूर. |
| १३ | नागपूर (ग्रामिण) | ७४-दवलामेटी | ना. मा. प्र | कारंजेकर सुधीर आनंदराव | रा. आठवा मैल, दवलामेटी, तह. नागपूर (ग्रा.), जि. नागपूर. |
| १४ | नागपूर (ग्रामिण) | ८०-डोंगरगाव | ना. मा. प्र (स्त्री) | खडसे उज्वला रोशन | रा. खरसोली, ता. नागपूर (ग्रा.), जि. नागपूर. |
| १५ | कुही | १०९-सिल्ली | ना. मा. प्र (स्त्री) | भुजाडे वैशाली चिंतामन | रा. मुसळगाव, तह. कुही, जि. नागपूर. |
| १६ | कुही | ११२-तारणा | ना. मा. प्र | खानोरकर संदिप श्रीराम | रा. तारणा, तह. कुही, जि. नागपूर. |

**रविंद्र ठाकरे,**
जिल्हाधिकारी,
नागपूर.

नागपूर :
दिनांक १६ मार्च २०२१.

ना.-एक-अ-३ (१५०६).

९

**मंगळवार, मार्च २३, २०२१/चैत्र २, शके १९४३**

भाग १-अ (असा.) (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १४.

## आयुक्त, महानगरपालिका, यांजकडून

### महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ नुसार फेरबदल

क्र. मनपाना-नरवि-३०११-२०२१.—

ज्याअर्थी, नागपूर शहराची सुधारीत विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३१(१) अन्वये शासन, अधिसूचना नगर विकास विभाग क्र. टिपीएस-२४९६-२६४३-प्र.क्र. ३००(अ)-९७-नवि-९, दिनांक ०७ जानेवारी २००० अन्वये भागशः मंजूर झाली असून ती दिनांक ०१ मार्च २००० पासून अंमलात आली आहे. तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसूचना, नगर विकास विभाग क्र. टिपीएस-२४००-१६२८-प्र.क्र. २००-२०००-नवि-९, दिनांक १०-०९-२००१ अन्वये मंजूर झाली असून ती दिनांक २१-०९-२००१ पासून अंमलात आलेली आहे. तसेच, शासनाचे नगर विकास विभागाची अधिसूचना क्र. टिपीएस-२४०१-८८५-प्र.क्र.-७६-नवि-९, दिनांक २७ फेब्रुवारी २००२ अन्वये नागपूर सुधार प्रन्यासच्या क्षेत्राअंतर्गत सात योजनांचे क्षेत्र वगळून उर्वरीत नागपूर शहराकरीता नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले आहे. तथापी शासनाकडील नगर विकास विभागाची अधिसूचना क्र. टिपीएस-२४१९-१४१९-प्र.क्र.-१५४-२०१९-नवि-९, दिनांक २७ ऑगस्ट २०१९ नागपूर सुधार प्रन्यासच्या कार्यक्षेत्राअंतर्गत असलेल्या सात योजनेकरीता सुध्दा नागपूर महानगरपालिका नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले आहे.

आणि ज्याअर्थी, नागपूर शहराच्या मंजूर विकास योजनेतील मौजा दिघोरी येथील दिघोरी गावठाण ते उमरेड रोड या दरम्यानच्या विद्यमान दिघोरी पांधन रस्ता हा सद्या सुमारे १०.०० मी. रूंदीचा असून सदर रस्ता हा अस्तित्वातील दिघोरी उड्डाणपुल ते उमरेड रस्त्यास पर्यायी रस्ता म्हणून उपलब्ध होणेच्या दृष्टीने दिघोरी गावठाणापासून ते उमरेड रोड पर्यंतचा सदर रस्ता पांधन रस्ता हा १८.०० मी. रूंद विकास योजना रस्ता प्रस्तावित करणे करण्याकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करण्याचे ठरविले आहे व यासाठी नागपूर महानगरपालिकेने ठराव क्र. २७-वि.क्र.०३, दिनांक २० जानेवारी २०२१ नुसार उपरोक्त फेरबदलाची कार्यवाही करण्यांस मंजुरी प्रदान केली आहे.

त्याअर्थी, उपरोक्त फेरबदल दर्शविणारा नागपूर शहराच्या सुधारीत विकास योजनेचा भाग नकाशा महानगरपालिकेच्या नगर रचना विभाग, श्री छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय इमारत, बी व सी विंग, तिसरा माळा, महानगरपालिका मार्ग, सिव्हील लाईन्स, नागपूर - ४४०००१ या कार्यालयात कामकाजाचे सर्व दिवशी कार्यालयीन कामकाजाचे वेळेत जनतेच्या निरीक्षणासाठी खुला ठेवण्यात आला आहे. तरी नागरिकांना सुचित

करण्यात येते की, ही सुचना प्रकाशित झाल्याचे तारखेपासून एक महिन्याचे कालावधीत विकास योजनेतील उपरोक्त फेरबदलाच्या संबंधात ज्या सूचना किंवा हरकती महानगरपालिकेकडे प्राप्त होतील त्यावर महानगरपालिकेकडून सुनावणी देण्यात येईल. तद्नंतर फेरबदलाचा प्रस्तुत प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी सादर करण्यात येईल.

**राधाकृष्णन बी.,**
आयुक्त,
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

नागपूर :
दिनांक १९ मार्च २०२१.

---

भाग १-अ (असा.) (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १५.

BY COMMISSIONER, MUNICIPAL CORPORATION

**MODIFICATION UNDER SECTION 37 OF MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.**

No. NMC-TPD-3011-2021.—

Whereas, the Revised Development Plan of Nagpur City prepared under the provisions of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966, Section 31 (*1*) has been partially sanctioned by the Govt. *vide* Urban Development Department Notification No. TPS-2496-2643-CR-300(a)-97-UD-9, Date 7th Jan 2000 and came into force from 1st March 2000. Excluded part of Development Plan has been sanctioned *vide* Government Notification No. TPS-2400-1648-CR-200-2000-UD-9,Date 10th September 2001 and came into force from date 21th September 2001. Also Nagpur Municipal Corporation has been declared as the "Planning Authority" for Nagpur City except the areas covered under seven scheme *vide* Govt. Notification No. TPS-2401-855-CR-76-UD-9, Date 27th February 2002.

Whereas, in the said Revised Sanctioned Development Plan, the Municipal Corporation is desirous of making some modifications u/s 37 of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 as detailed below-

In the Sanctioned Development Plan of the Nagpur City, the width of existing road between Dighori Gawthan to Umred Road (Pandhan Road) is 10.00 mtr. wide and it will be very useful for the users of width road if increases.

Whereas, as per Section 37 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966, Nagpur Municipal Corporation has decided to modify 10.00 mtr. wide D.P. road by increasing the width of such road by keeping up to 18.00 mtr. Wide D.P. Road from Dighori Gawthan to Umred Road, Mouza- Dighori, Nagpur Municipal Corporation has passed the Resolution No.27, Subject No.03, date 20-01-2021 to make the aforesaid modification.

The part plan of Development Plan of Nagpur City showing the aforesaid modification are kept open at the office of the Town Planning Department of Nagpur Municipal Corporation for inspection by public during office hours on all working days. The suggestions and objections which may be recieved to Municipal Corporation in respect of the said modification to the development plan within a period of one month from the date of publication of this notice, will be heard by the Municipal Commissioner before submitting the said modification proposal, to the State Government for sanction.

RADHAKRISHNAN B.,
Commissioner,
Nagpur Municipal Corporation ,
Nagpur.

Nagpur :
Dated the 19th March 2021.

१०

**बुधवार, मार्च २४, २०२१/चैत्र ३, शके १९४३**

भाग १-अ (असा.) (ना. वि. पु), म. शा. रा., अ, क्र. १६

## जिल्हाधिकारी, यांजकडून

क्रमांक रानिआ-जिपपंस-२०१८-प्रक्र. १२-का-७, दिनांक २६ मार्च २०१९, ज्याअर्थी, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा. ५ वा) च्या कलम १२(१) तसेच कलम ५८(१) खाली क्रमांक निवडणूक-१-कार्या-१३-कावि ३१२-२०१९, दिनांक १७ मे २०१९ अन्वये नागपूर जिल्हा परिषद व त्याअंतर्गत पंचायत समित्या जितक्या निवडणूक विभागामध्ये/निर्वाचक गणामध्ये विभागण्यात येतील त्या निवडणूक विभागाची/निर्वाचक गणांची संख्या व व्याप्ती निश्चित केली आहे आणि त्या निवडणूक विभागामध्ये/निर्वाचक गणांमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग आणि स्त्रियांकरिता (अनुसूचित जाती, अनुसूचीत जमाती व नागरिकांचा मागासप्रर्वगातील स्त्रियांसह) जागा राखुन ठेवण्यात येत आहेत ते निवडणूक विभाग/निर्वाचक गण दर्शविणारा आदेश प्रसिद्ध करण्यात आला आहे.

आणि ज्याअर्थी, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या रिट याचिका (सिव्हील) क्रमांक ९८०/२०१९ व इतर याचिकामध्ये दिनांक ४ मार्च २०२१ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने राज्य निवडणूक आयोगाने नागपूर जिल्हा परिषद व त्याअंतर्गत येणा-या एकूण १३ पंचायत समित्यांमध्ये नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता राखीव असलेल्या जागांवरून निवडून आलेल्या उमेदवारांची निवडणूक दिनांक ४ मार्च २०२१ पासून रद्द करण्याबाबत निर्देश दिले व त्यानुसार सर्व संबंधित निवडणूक विभाग व निर्वाचक गणातील जागा रिक्त झाल्या असून त्या जागा सर्वसाधारण प्रवर्गातून भरणे क्रमप्राप्त झाले. सदर सर्वसाधारण जागापैकी कोणत्या जागा सर्वसाधारण महिला प्रवर्गातून भरण्यात येतील याकरिता राज्य निवडणूक आयोगाने क्रमांक रानिआ-जिपपंस-२०२१-प्रक्र ०५-का-७, दिनांक १७ मार्च २०२१ रोजी दिलेल्या कार्यक्रमानुसार दिनांक २३ मार्च २०२१ रोजी सोडत काढण्यात आली.

आणि ज्याअर्थी, सदर सोडतीनुसार नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या रिक्त झालेल्या जागा सर्वसाधारण अथवा सर्वसाधारण महिला यापैकी कोणत्या प्रवर्गातून भरण्यात येतील हे अधिसूचित करणे आवश्यक झाले असून त्यानुसार मी, रविंद्र ठाकरे, जिल्हाधिकारी, नागपूर सदर अधिनियमाच्या कलम १२(१) तसेच ५८(१) सह राज्य निवडणूक आयोगाची अधिसूचना क्रमांक रानिआ-जिपपंस-२०११-प्रक्र १२-का-७, दिनांक २९ सप्टेंबर २०११ अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून निम्नोक्त सुधारित आदेश देत आहे.

### सुधारणा आदेश

### नागपूर जिल्हा परिषद अंतिम प्रभाग रचना

आदेश क्रमांक निवडणूक-१-कार्या-१३-कावि-२०४-२०२१, दिनांक २३ मार्च २०२१ च्या—

(१) परिच्छेद क्रमांक ०१ येथील नागपूर जिल्हापरिषदेच्या नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या जागांशी संबंधित संपूर्ण मजकूर वगळण्यात येत आहे.

(२) परिच्छेद क्रमांक ०२ येथील नागपूर जिल्हापरिषदेच्या सर्वसाधारण स्त्रियांसाठी राखून ठेवायच्या जागांची संख्या **१२ ऐवजी २०** अशी सुधारण्यात येत आहे.

(३) परिच्छेद क्रमांक ०३ खालील नागपूर जिल्हापरिषदेच्या अनुसूचीमध्ये खाली दर्शविल्याप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे :—

**अनुसूची**

| तालुक्याचे नाव | निवडणूक विभाग क्रमांक व नाव | रकाना क्रमांक (०२) मधील राखीव जागांची सोडतीनुसार सुधारित आरक्षण |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| नरखेड | २ - सावरगाव | सर्वसाधारण महिला |
| नरखेड | ४ - भिष्णूर | सर्वसाधारण |
| काटोल | ५ - येनवा | सर्वसाधारण |
| काटोल | ६ - पारडसिंगा | सर्वसाधारण महिला |
| सावनेर | १३ - वाकोडी | सर्वसाधारण महिला |
| सावनेर | १४ - केळवद | सर्वसाधारण महिला |
| पारशिवनी | १९ - करंभाड | सर्वसाधारण महिला |
| रामटेक | २३ - बोथिया (पालोरा) | सर्वसाधारण |
| मौदा | २७ - अरोली | सर्वसाधारण |
| कामठी | ३४ - गुमथळा | सर्वसाधारण |
| कामठी | ३५ - वडोदा | सर्वसाधारण महिला |
| नागपूर (ग्रामिण) | ३६ - गोधनी (रेल्वे) | सर्वसाधारण |
| हिंगणा | ४३ - निलडोह | सर्वसाधारण |
| हिंगणा | ४४ - डिगडोह | सर्वसाधारण महिला |
| हिंगणा | ४५ - डिगडोह-इसासनी | सर्वसाधारण महिला |
| कुही | ५३ - राजोला | सर्वसाधारण |

**नरखेड पंचायत समिती अंतिम प्रभाग रचना**

आदेश क्रमांक निवडणूक-१-कार्या-१३-कावि-२०४-२०२१, दिनांक २३ मार्च २०२१ च्या—

(४) परिच्छेद क्रमांक ०१ येथील नरखेड पंचायत समितीच्या नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या जागांशी संबंधित संपूर्ण मजकूर वगळण्यात येत आहे.

(५) परिच्छेद क्रमांक ०२ येथील नरखेड पंचायत समितीच्या सर्वसाधारण स्त्रियांसाठी राखून ठेवायच्या जागांची संख्या **०३ ऐवजी ०४** अशी सुधारण्यात येत आहे.

(६) परिच्छेद क्रमांक ०३ खालील नरखेड पंचायत समितीच्या अनुसूचीमध्ये खाली दर्शविल्याप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे :—

**अनुसूची**

| तालुक्याचे नाव | निर्वाचक गण क्रमांक व नाव | रकाना क्रमांक (०२) मधील राखीव जागांची सोडतीनुसार सुधारित आरक्षण |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| नरखेड | ०१ - बेलोना | सर्वसाधारण महिला |
| नरखेड | ०३ - सावरगाव | सर्वसाधारण |

उपरोक्त सुधारणा आदेश हा या आदेशाच्या दिनांकानंतर होणा-या निवडणुकीकरिता लागू राहील.

ना.-एक-अ-४ (१५०६).

**काटोल पंचायत समिती अंतिम प्रभाग रचना**

आदेश क्रमांक निवडणूक-१-कार्या-१३-कावि-२०४-२०२१, दिनांक २३ मार्च २०२१ च्या—

(४) परिच्छेद क्रमांक ०१ येथील काटोल पंचायत समितीच्या नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या जागांशी संबंधित संपूर्ण मजकूर वगळण्यात येत आहे.

(५) परिच्छेद क्रमांक ०२ येथील काटोल पंचायत समितीच्या सर्वसाधारण स्त्रियांसाठी राखून ठेवायच्या जागांची संख्या **०३ ऐवजी ०४** अशी सुधारण्यात येत आहे.

(६) परिच्छेद क्रमांक ०३ खालील काटोल पंचायत समितीच्या अनुसूचीमध्ये खाली दर्शविल्याप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे :—

**अनुसूची**

| तालुक्याचे नाव | निर्वाचक गण क्रमांक व नाव | रकाना क्रमांक (०२) मधील राखीव जागांची सोडतीनुसार सुधारित आरक्षण |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| काटोल | १२ - लाडगांव | सर्वसाधारण महिला |
| काटोल | १३ - मेटपांजरा | सर्वसाधारण |

उपरोक्त सुधारणा आदेश हा या आदेशाच्या दिनांकानंतर होणा-या निवडणुकीकरिता लागू राहील.

**कळमेश्वर पंचायत समिती अंतिम प्रभाग रचना**

आदेश क्रमांक निवडणूक-१-कार्या-१३-कावि-२०४-२०२१, दिनांक २३ मार्च २०२१ च्या—

(१) परिच्छेद क्रमांक ०१ येथील कळमेश्वर पंचायत समितीच्या नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या जागांशी संबंधित संपूर्ण मजकूर वगळण्यात येत आहे.-

(२) परिच्छेद क्रमांक ०२ येथील कळमेश्वर पंचायत समितीच्या सर्वसाधारण स्त्रियांसाठी राखून ठेवायच्या जागांची संख्या **०२ ऐवजी ०३** अशी सुधारण्यात येत आहे.

(३) परिच्छेद क्रमांक ०३ खालील कळमेश्वर पंचायत समितीच्या अनुसूचीमध्ये खाली दर्शविल्याप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे :—

**अनुसूची**

| तालुक्याचे नाव | निर्वाचक गण क्रमांक व नाव | रकाना क्रमांक (०२) मधील राखीव जागांची सोडतीनुसार सुधारित आरक्षण |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| कळमेश्वर | १७ - तेलकामठी | सर्वसाधारण महिला |
| कळमेश्वर | १८ - कोहळी | सर्वसाधारण |

उपरोक्त सुधारणा आदेश हा या आदेशाच्या दिनांकानंतर होणा-या निवडणुकीकरिता लागू राहील.

## सावनेर पंचायत समिती अंतिम प्रभाग रचना

आदेश क्रमांक निवडणूक-१-कार्या-१३-कावि-२०४-२०२१, दिनांक २३-०३-२०२१ च्या.—

(४) परिच्छेद क्रमांक ०१ येथील सावनेर पंचायत समितीच्या नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या जागांशी संबंधित संपूर्ण मजकूर वगळण्यात येत आहे.

(५) परिच्छेद क्रमांक ०२ येथील सावनेर पंचायत समितीच्या सर्वसाधारण स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागांची संख्या **०२ ऐवजी ०४** अशी सुधारण्यात येत आहे.

(६) परिच्छेद क्रमांक ०३ खालील सावनेर पंचायत समितीच्या अनुसूचीमध्ये खाली दर्शविल्याप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.—

### अनुसूची

| तालुक्याचे नाव | निर्वाचक गण क्रमांक व नाव | रकाना क्रमांक ०२ मधील राखीव जागांची सोडतीनुसार सुधारित आरक्षण |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| सावनेर | २३ - बडेगाव | सर्वसाधारण महिला |
| सावनेर | २६ - वाघोडा | सर्वसाधारण महिला |
| सावनेर | २८ - नांदागोमुख | सर्वसाधारण |

उपरोक्त सुधारणा आदेश हा या आदेशाच्या दिनांकानंतर होणा-या निवडणुकीकरीता लागू राहील.

## पारशिवनी पंचायत समिती अंतिम प्रभाग रचना

आदेश क्रमांक निवडणूक-१-कार्या-१३-कावि-२०४-२०२१, दिनांक २३-०३-२०२१ च्या.—

(४) परिच्छेद क्रमांक ०१ येथील पारशिवनी पंचायत समितीच्या नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या जागांशी संबंधित संपूर्ण मजकूर वगळण्यात येत आहे.

(५) परिच्छेद क्रमांक ०२ येथील पारशिवनी पंचायत समितीच्या सर्वसाधारण स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागांची संख्या **०२ ऐवजी ०३** अशी सुधारण्यात येत आहे.

(६) परिच्छेद क्रमांक ०३ खालील पारशिवनी पंचायत समितीच्या अनुसूचीमध्ये खाली दर्शविल्याप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.—

### अनुसूची

| तालुक्याचे नाव | निर्वाचक गण क्रमांक व नाव | रकाना क्रमांक ०२ मधील राखीव जागांची सोडतीनुसार सुधारित आरक्षण |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| पारशिवनी | ३५ - चारगांव | सर्वसाधारण |
| पारशिवनी | ३८ - नयाकुंड | सर्वसाधारण महिला |

उपरोक्त सुधारणा आदेश हा या आदेशाच्या दिनांकानंतर होणा-या निवडणुकीकरीता लागू राहील.

## रामटेक पंचायत समिती अंतिम प्रभाग रचना

आदेश क्रमांक निवडणूक-१-कार्या-१३-कावि-२०४-२०२१, दिनांक २३-०३-२०२१ च्या.—

(४) परिच्छेद क्रमांक ०१ येथील रामटेक पंचायत समितीच्या नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या जागांशी संबंधित संपूर्ण मजकूर वगळण्यात येत आहे.

(५) परिच्छेद क्रमांक ०२ येथील रामटेक पंचायत समितीच्या सर्वसाधारण स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागांची संख्या **०० ऐवजी ०२** अशी सुधारण्यात येत आहे.

(६) परिच्छेद क्रमांक ०३ खालील रामटेक पंचायत समितीच्या अनुसूचीमध्ये खाली दर्शविल्याप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.—

| तालुक्याचे नाव | निर्वाचक गण क्रमांक व नाव | रकाना क्रमांक ०२ मधील राखीव जागांची सोडतीनुसार सुधारित आरक्षण |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| रामटेक | ४६ - उमरी | सर्वसाधारण |
| रामटेक | ४९ - मनसर | सर्वसाधारण महिला |
| रामटेक | ५१ - नगरधन | सर्वसाधारण महिला |

उपरोक्त सुधारणा आदेश हा या आदेशाच्या दिनांकानंतर होणा-या निवडणुकीकरीता लागू राहील.

## मौदा पंचायत समिती अंतिम प्रभाग रचना

आदेश क्रमांक निवडणूक-१-कार्या-१३-कावि-२०४-२०२१, दिनांक २३-०३-२०२१ च्या.—

(४) परिच्छेद क्रमांक ०१ येथील मौदा पंचायत समितीच्या नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या जागांशी संबंधित संपूर्ण मजकूर वगळण्यात येत आहे.

(५) परिच्छेद क्रमांक ०२ येथील मौदा पंचायत समितीच्या सर्वसाधारण स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागांची संख्या **०३ ऐवजी ०५** अशी सुधारण्यात येत आहे.

(६) परिच्छेद क्रमांक ०३ खालील मौदा पंचायत समितीच्या अनुसूचीमध्ये खाली दर्शविल्याप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.—

### अनुसूची

| तालुक्याचे नाव | निर्वाचक गण क्रमांक व नाव | रकाना क्रमांक ०२ मधील राखीव जागांची सोडतीनुसार सुधारित आरक्षण |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| मौदा | ५५ - खात | सर्वसाधारण महिला |
| मौदा | ५६ - रेवराल | सर्वसाधारण |
| मौदा | ६२ - चिरव्हा | सर्वसाधारण महिला |

उपरोक्त सुधारणा आदेश हा या आदेशाच्या दिनांकानंतर होणा-या निवडणुकीकरीता लागू राहील.

## कामठी पंचायत समिती अंतिम प्रभाग रचना

आदेश क्रमांक निवडणूक-१-कार्या-१३-कावि-२०४-२०२१, दिनांक २३-०३-२०२१ च्या.—

(४) परिच्छेद क्रमांक ०१ येथील कामठी पंचायत समितीच्या नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या जागांशी संबंधित संपूर्ण मजकूर वगळण्यात येत आहे.

(५) परिच्छेद क्रमांक ०२ येथील कामठी पंचायत समितीच्या सर्वसाधारण स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागांची संख्या **०२ ऐवजी ०३** अशी सुधारण्यात येत आहे.

(६) परिच्छेद क्रमांक ०३ खालील कामठी पंचायत समितीच्या अनुसूचीमध्ये खाली दर्शविल्याप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

### अनुसूची

| तालुक्याचे नाव | निर्वाचक गण क्रमांक व नाव | रकाना क्रमांक ०२ मधील राखीव जागांची सोडतीनुसार सुधारित आरक्षण |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| कामठी | ६८-महालगाव | सर्वसाधारण महिला |
| कामठी | ७०-बिडगाव | सर्वसाधारण |

उपरोक्त सुधारणा आदेश हा या आदेशाच्या दिनांकानंतर होणा-या निवडणुकीकरीता लागू राहील.

**नागपूर (ग्रामीण) पंचायत समिती अंतिम प्रभाग रचना**

आदेश क्रमांक निवडणूक-१-कार्या-१३-कावि-२०४-२०२१, दिनांक २३ मार्च २०२१ च्या—

(४) परिच्छेद क्रमांक ०१ येथील नागपूर (ग्रामीण) पंचायत समितीच्या नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या जागांशी सबंधित संपूर्ण मजकूर वगळण्यात येत आहे.

(५) परिच्छेद क्रमांक ०२ येथील नागपूर (ग्रामीण) पंचायत समितीच्या सर्वसाधारण स्त्रियांसाठी राखून ठेवायच्या जागांची संख्या **०२ ऐवजी ०४** अशी सुधारण्यात येत आहे.

(६) परिच्छेद क्रमांक ०३ खालील नागपूर (ग्रामीण) पंचायत समितीच्या अनुसूचीमध्ये खाली दर्शविल्याप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे :—

**अनुसूची**

| तालुक्याचे नाव | निर्वाचक गण क्रमांक व नाव | रकाना क्रमांक (०२) मधील राखीव जागांची सोडतीनुसार सुधारित आरक्षण |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| नागपूर (ग्रामीण) | ७१ - भोकारा | सर्वसाधारण |
| नागपूर (ग्रामीण) | ७४ - दवलामेठी | सर्वसाधारण महिला |
| नागपूर (ग्रामीण) | ८० - डोंगरगाव | सर्वसाधारण महिला |

उपरोक्त सुधारणा आदेश हा या आदेशाच्या दिनांकानंतर होणा-या निवडणुकीकरीता लागू राहील.

**हिंगणा पंचायत समिती अंतिम प्रभाग रचना**

आदेश क्रमांक निवडणूक-१-कार्या-१३-कावि-२०४-२०२१, दिनांक २३ मार्च २०२१ च्या—

(४) परिच्छेद क्रमांक ०१ येथील हिंगणा पंचायत समितीच्या नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या जागांशी सबंधित संपूर्ण मजकूर वगळण्यात येत आहे.

(५) परिच्छेद क्रमांक ०२ येथील हिंगणा पंचायत समितीच्या सर्वसाधारण स्त्रियांसाठी राखून ठेवायच्या जागांची संख्या **०३ ऐवजी ०५** अशी सुधारण्यात येत आहे.

(६) परिच्छेद क्रमांक ०३ खालील हिंगणा पंचायत समितीच्या अनुसूचीमध्ये खाली दर्शविल्याप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे :—

**अनुसूची**

| तालुक्याचे नाव | निर्वाचक गण क्रमांक व नाव | रकाना क्रमांक (०२) मधील राखीव जागांची सोडतीनुसार सुधारित आरक्षण |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| हिंगणा | ८५ - निलडोह वडधामना | सर्वसाधारण महिला |
| हिंगणा | ८७ - डिगडोह - १ | सर्वसाधारण |
| हिंगणा | ८९ - डिगडोह इसासनी | सर्वसाधारण |
| हिंगणा | ९३ - नेरी मानकर | सर्वसाधारण महिला |

उपरोक्त सुधारणा आदेश हा या आदेशाच्या दिनांकानंतर होणा-या निवडणुकीकरीता लागू राहील.

ना.-एक-अ-५ (१५०६).

## उमरेड पंचायत समिती अंतिम प्रभाग रचना

आदेश क्रमांक निवडणूक-१-कार्या-१३-कावि-२०४-२०२१, दिनांक २३ मार्च २०२१ च्या—

(४) परिच्छेद क्रमांक ०१ येथील उमरेड पंचायत समितीच्या नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या जागांशी सबंधित संपूर्ण मजकूर वगळण्यात येत आहे.

(५) परिच्छेद क्रमांक ०२ येथील उमरेड पंचायत समितीच्या सर्वसाधारण स्त्रियांसाठी राखून ठेवायच्या जागांची संख्या **०२ ऐवजी ०३** अशी सुधारण्यात येत आहे.

(६) परिच्छेद क्रमांक ०३ खालील उमरेड पंचायत समितीच्या अनुसूचीमध्ये खाली दर्शविल्याप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे :—

### अनुसूची

| तालुक्याचे नाव | निर्वाचक गण क्रमांक व नाव | रकाना क्रमांक (०२) मधील राखीव जागांची सोडतीनुसार सुधारित आरक्षण |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| उमरेड | ९८ - मकरधोकडा | सर्वसाधारण महिला |
| उमरेड | १०१ - देवळी आमगाव | सर्वसाधारण |

उपरोक्त सुधारणा आदेश हा या आदेशाच्या दिनांकानंतर होणा-या निवडणुकीकरीता लागू राहील.

## कुही पंचायत समिती अंतिम प्रभाग रचना

आदेश क्रमांक निवडणूक-१-कार्या-१३-कावि-२०४-२०२१, दिनांक २३ मार्च २०२१ च्या—

(४) परिच्छेद क्रमांक ०१ येथील कुही पंचायत समितीच्या नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या जागांशी सबंधित संपूर्ण मजकूर वगळण्यात येत आहे.

(५) परिच्छेद क्रमांक ०२ येथील कुही पंचायत समितीच्या सर्वसाधारण स्त्रियांसाठी राखून ठेवायच्या जागांची संख्या **०२ ऐवजी ०३** अशी सुधारण्यात येत आहे.

(६) परिच्छेद क्रमांक ०३ खालील कुही पंचायत समितीच्या अनुसूचीमध्ये खाली दर्शविल्याप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे :—

### अनुसूची

| तालुक्याचे नाव | निर्वाचक गण क्रमांक व नाव | रकाना क्रमांक (०२) मधील राखीव जागांची सोडतीनुसार सुधारित आरक्षण |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| कुही | १०९ - सिल्ली | सर्वसाधारण महिला |
| कुही | ११२ - तारणा | सर्वसाधारण |

उपरोक्त सुधारणा आदेश हा या आदेशाच्या दिनांकानंतर होणा-या निवडणुकीकरीता लागू राहील.

**भिवापूर पंचायत समिती अंतिम प्रभाग रचना**

आदेश क्रमांक निवडणूक-१-कार्या-१३-कावि-२०४-२०२१, दिनांक २३ मार्च २०२१ च्या—

(४) परिच्छेद क्रमांक ०१ येथील भिवापूर पंचायत समितीच्या नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या जागांशी सबंधित संपूर्ण मजकूर वगळण्यात येत आहे.

(५) परिच्छेद क्रमांक ०२ येथील भिवापूर पंचायत समितीच्या सर्वसाधारण स्त्रियांसाठी राखून ठेवायच्या जागांची संख्या **०१ ऐवजी ०२** अशी सुधारण्यात येत आहे.

(६) परिच्छेद क्रमांक ०३ खालील भिवापूर पंचायत समितीच्या अनुसूचीमध्ये खाली दर्शविल्याप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे :—

**अनुसूची**

| तालुक्याचे नाव | निर्वाचक गण क्रमांक व नाव | रकाना क्रमांक (०२) मधील राखीव जागांची सोडतीनुसार सुधारित आरक्षण |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| भिवापूर | ११६ - नांद | सर्वसाधारण महिला |

उपरोक्त सुधारणा आदेश हा या आदेशाच्या दिनांकानंतर होणा-या निवडणुकीकरीता लागू राहील.

**रविंद्र ठाकरे,**
जिल्हाधिकारी,
नागपूर.

नागपूर :
दिनांक २३ मार्च २०२१.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.